# प्रभुतरुण


| वर्ष ५२ | अंक ५ | मुंबई | डिसेंबर, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## शुभेच्छा

**—सुहासिनी कीर्तिकर**

मंडळी; बघता बघता (कीं लिहीता लिहीता; वाचता वाचता?) २०१८ साल संपत आले. पुढील महिन्यापासून 'प्रभुतरुण' मध्ये नवे लेखक, नवी सदरे! अर्थात काही माझ्यासारखे (अन् काही इतरही) 'मागील पानावरून पुढे चालू असतीलच. हां! मात्र 'चालू' हा शब्द 'त्या' अर्थाने नाही बरं का! इतरांच्या बाबतीत तर नाहीच नाही. आपण सगळेच तसे सरळ वळणाचे. 'सरळ वळणाचे' म्हटल्यावर सहज आठवण झाली 'पु.लं.' नी केलेल्या कोटीची. ते म्हणाले होते, 'मुलगी अगर मुलगा सरळ वळणाची अगर वळणाचा कसा असतो कोण जाणे! कारण वळण म्हटल्यावर ते सरळ कसे असणार? भूमितीला बुचकळ्यात ढकलणारी ही सरळ वळणाची आडवळणी व्याख्या आहे!''

तसंही 'पुलं' आठवायला सरळ सरळ कारण आहे. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. मग आडवळण न घेता सरळपणे त्यांचे काही विनोद हे वर्ष संपता संपता इथे मांडते तुमच्यासमोर. हो! अन् विनोद कधीच 'जुना' होत नाही. 'पुलं' चा तर नाहीच नाही. त्यामुळे तुम्हाला जरी माहीत असतील हे विनोद तरी त्यातली खुमारी कमी होणारच नाही. कारण अशा विनोदात येणारे / असणारे 'पुलं'चे मिश्कील भाष्य. असे भाष्य असणारा असाच एक विनोद-

यश म्हणजे?

वयाच्या चौथ्या वर्षी यश म्हणजे आता चड्डीत 'शू' न करणे. आठव्या वर्षी यश म्हणजे घरी परत येण्याचा नेमका रस्ता माहीत असणे.

बाराव्या वर्षी यश म्हणजे मित्र मंडळी जमा होणे.

अठराव्या वर्षी यश म्हणजे ड्रायव्हिंग लायसन्स मिळणे.

तेवीसाव्या वर्षी यश म्हणजे विद्यापीठातून पदवी संपादन करणे.

पंचविसाव्या वर्षी यश म्हणजे मनाजोगता जॉब मिळणे/मिळविणे.

तिसाव्या वर्षी यश म्हणजे लग्न करून स्थिरस्थावर होणे.

पस्तिसाव्या वर्षी यश म्हणजे बऱ्यापैकी पैसा कमवणे.

पंचेचाळीसाव्या वर्षी यश म्हणजे अद्यापही आपण तरुण असल्याचा भास निर्माण करणे.

पन्नासाव्या वर्षी यश म्हणजे मुलांना चांगले शिक्षण देणे.

पंचावन्नाव्या वर्षी यश म्हणजे आजही सगळी कर्तव्ये पार पाडण्यासाठी सक्षम असणे.

साठाव्या वर्षी यश म्हणजे निरोगी आयुष्य जगणे.

सत्तराव्या वर्षी यश म्हणजे कुणासाठी आपण ओझे बनून नाहीत; याचे समाधान असणे.

पंचाहत्तराव्या वर्षी यश म्हणजे जुन्या मित्रांसोबत लहानपणीच्या गप्पा मारणे.

ऐंशीव्या वर्षी यश म्हणजे घरी परत येण्याचा रस्ता लक्षात ठेवणे आणि

पंच्याऐंशीव्या वर्षी यश म्हणजे पुन्हा एकदा चड्डीत 'शू' न करणे.

पहा! चौथ्या, आठव्या वर्षी असणारी यशाची कल्पना पुन्हा ऐंशी, पंच्याऐंशीव्या वर्षी 'आडवळण' घेऊन 'वळणावर' आलीय नं! 'शरद तळवलकर' यांची ओळख होताच लगेच 'कानामात्रावेलांटीशिवायचे नाव' अशी खासियत सांगणे किंवा शंतनुराव किर्लोस्करांच्या 'बो' लावण्याच्या पेहरावावर 'त्यांच्या आईने सांगितलेय की बोलावल्याशिवाय कुठेही जायचं नाही.' असे द्व्यर्थी भाष्य करीत हास्य फुलवणे हे 'पुलं'कीत विशेष कदाचित इतरांनाही जमू शकतील. पण 'यश म्हणजे' सांगताना असे लांबलचक हास्यलेखन वा भाष्य करणे हे 'पुलं'नाच जमावे. यामागे निरीक्षणाबरोबरच परीक्षण वा चिंतन आहे. ऐकणाऱ्याला वा वाचणाऱ्याला दाद द्यावीशी वाटावी असं. म्हणूनच ना ते 'महाराष्ट्र भूषण'!

असंच भूषणावह लांबलचक भाष्य त्यांच्या पुढील विनोदातही प्रत्ययाला येतं. एकदा वसंत सबनीस त्यांची जाहीर मुलाखत घेत होते. त्यांनी 'पुलं'ना विचारले, ''आजपर्यंत तुम्ही भावगीत गायक, शिक्षक, नट, संगीत दिग्दर्शक, नाट्यदिग्दर्शक, प्राध्यापक, पटकथाकार आणि साहित्यिक यांच्या वरातीत सामील झाला होता. हीच वराच तुम्ही आता वाऱ्यावर सोडली आहे. हे खरं आहे काय?''

त्यावर 'पुलं'नी तात्काळ उत्तर दिले. ते म्हणाले, 'वाऱ्याचीच गोष्ट काढलीत म्हणून सांगतो! भावगीत गायक झालो तो काळ 'वारा फोफावला' चा होता! नट झालो असतो तर वारावर जेवायची पाळी आली असती. शिक्षक झालो त्यावेळी ध्येयवादाचा वारा प्यायलो होतो. संगीत दिग्दर्शक झालो त्यावेळी पेटीत वारा भरून सूर काढत होतो. नाट्यदिग्दर्शक झालो त्यावेळी बेकार आ 'वारा' होतो. ('पुलं'नी या वाक्यात 'बे'कार म्हणजे कारविना असाही सूर आणला होता उत्तर देताना.) प्राध्यापक झालो तेव्हा विद्वत्तेचा वारा अंगावरून गेला होता. पटकथा लिहिल्या त्या वाऱ्यावर उडून गेल्या. नुसताच साहित्यिक झालो असतो तर कुणी वाऱ्यावर उभं नसतं राहिलं! ही सर्व सोंगं करताना फक्त एकच खबरदारी घेतली. ती म्हणजे कानात वारं शिरू न देण्याची. आयुष्यात अनेक प्रकारच्या वाऱ्यांतून हिंडलो. त्यातून जे जीवंत कण डोळ्यांत गेले ते साठवले आणि त्यांची आता वरात काढली. लोकं हसतात.... माझ्या डोळ्यात आतल्याआत कृतज्ञतेचं पाणी येतं आणि म्हणूनच अंगाला अहंकाराचा वारा लागत नाही'.... व्वा! ही 'पुलं'ची चिंतनशील 'वाऱ्यावरची वरात'!

वसंत सबनीसांनी 'पुलं'च्या 'वाऱ्यावरची वरात'चा शब्दच्छल करून बेरकी; तरीही सरळ प्रश्न टाकला होता. तर 'पुलं'नीही लगेच त्यातला 'वारा' पकडून बेरकी, तरीही आपलं जगण्याचं तत्त्वज्ञान मांडणारं भाष्य श्रोत्यांच्या मनापर्यंत असं छान आनंदाच्या 'वाऱ्यावर' सोडलं.

शब्द वेचून त्यातलं हास्यकारक इंगीत जाणणे पुलंची खासियतच. सगळ्यांनाच ती ठाऊक आहे. तरीही शेलकी किस्से देण्याचा मोह इथे आवरतच नाही. तेवढे सांगते आणि आवरतं घेते.

दामूअण्णा मालवणकरांना मुलगी झाली. (भारती मंगेशकर आताची.) ती झाली तेव्हा 'पुलं' हसत हसत म्हणाले, ''ही मुलगी बापाचा डोळा चुकवून आलीय!' (दामूअण्णा काणे होते ना!) मधू कदम नावाचा त्यांचा मित्र त्यांना पेढे देत म्हणाला, 'मला मुलगा झाला.' तो पेढा खात 'पुलं' म्हणाले, ''कदम कदम बढाये जा!'' एकदा ते एका आडगावी गेले होते. तिकडच्या शाळेतल्या प्राचार्यांनी त्यांना शाळेला भेट देण्याचे आमंत्रण दिले. 'पुलं' गेले. त्यांना पुष्पगुच्छ वगैरे देऊन व्यासपीठावर बसण्याची प्राचार्यांनी विनंती केली. 'पुलं' बसताच त्यांच्या खुर्चीचा हात मोडला. सगळी पोरं खोखो हसायला लागली. बिचारे प्राचार्य ओशाळून त्यांना म्हणाले, ''माफ करा. पण हज्जार वेळा सांगूनही इकडच्या सुतारांकडून नीट कामच होत नाही.'' 'पुलं' मिस्कीलपणे म्हणाले, ''अहो, करवत (!) नसेल!''

अशी विनोदाची करवत चालवणारे पुलं अद्वितीयच. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या अशा आठवणी जागवून आपण २०१८ सालाला आनंदानं निरोप देत २०१९ सालाचे मनापासून स्वागत करूया. आपली सर्वांची आनंदाची 'वाऱ्यावरची वरात' अशीच चालत राहू द्या. तुम्हा सर्व 'प्रभुतरूण' प्रेमींना वृत्तीनं 'तरुण' रहाण्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

*

# पा.प्र. चॅरिटीज- लखलख चंदेरी

दोन डिसेंबरचा रविवार. दरवर्षीप्रमाणे एमव्हीएम कॉलेजचे सभागृह पा. प्रभू ज्ञातीयांच्या उत्साही वृत्तीने संध्याकाळचे रंग अनुभवत होते. आनंदाचा जल्लोश. पण सुसंस्कृत आणि शिस्तबद्ध. 'पा. प्र. चॅरिटीज'चा विद्यार्थी सत्कार समारंभ. हे विद्यार्थी कोण?... तर 'शारदेच्या दरबारातील विद्याभूषण मानकरी! किती असावेत? एकूण साठ! तुतारीच्या मंगल निनादात त्यांची मिरवणूक. त्यावेळी असणारे या समारंभाचे प्रमुख पाहुणे सौ. वीणा विकास मानकर आणि श्री. विकास भगवान मानकर या मिरवणूकीत सामील. चॅरिटीजचे विश्वस्तही त्यात. टाळ्यांच्या कडकडाटात सभागृहाने उभे राहून केलेले स्वागत. हे विद्यार्थी भविष्यात अनेक सत्कारांचे मानकरी होतीलच. पण ज्ञातीयांनी आणि ज्ञातीच्या एका प्रमुख संस्थेने केलेला त्यांचा सन्मान ही त्यांची आयुष्यभराची शिदोरी असेल. त्यांच्या कुटुंबीयांचा अभिमानाचा विषयही. दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या या सोहळ्याची गोडी यामुळेच कधी कमी होत नाही. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शारदादेवीला वंदन आणि दीप प्रज्ज्वलन झाल्यावर मंचावर ही मांदियाळी विराजमान. चॅरीटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांनी सर्वांचे स्वागत करून, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पाहुण्यांची यथोचित ओळख करून दिली. पण त्याआधी या समारंभाचे हे पंचविसावे वर्ष म्हणून सुरुवातीपासूनचा आढावा घेतला. बरोबरच आहे. झोका पुढे नेताना तो थोडा मागे न्यावा लागतो. तसेच भविष्यात अशीच कामगिरी पुढे करताना त्यांनी या बक्षिस समारंभाच्या मागच्या भूतकाळाला जागवले. 'श्री. वीरपाल राणे, श्री. अजित विजयकर हे चॅरिटीजचे पूर्वाध्यक्ष. त्यांच्या काळापासून सुरू झालेला हा गौरवसमारंभ चॅरिटीजचे राणे संकुल, मग जी. ए. रानडे सभागृह, आता 'एमव्हीएम'चे सभागृह असे करत पंचतारांकीत हॉटेलच्या प्रशस्त खुल्या जागेतही भविष्यात होईल...' असे भाकीत त्यांनी केले. मला आठवतेय की आमच्या विहंग नायक यांनी आपल्या संपादकीयात हा समारंभ भविष्यात शिवाजी पार्क मैदानातच घ्यावा लागेल; असे म्हटले होते. परवाच्या उदय मानकरांच्या भविष्यवाणीला म्हणून हजर असलेल्या प्रत्येकाने मनोमन 'तथास्तु' म्हटले. हा पंचवीसावा सोहळा म्हणून गौरवचिन्हावरही २५ ठळकपणे उमटले होते. यावेळचे खास वेगळेपण म्हणजे सौ. वीणा आणि श्री. विकास यांनी आपल्या कर्तृत्वाच्या हातात हात घालून जोडीने भाषण केले. आपल्या कर्तृत्वाचा आढावा, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन असे त्याचे स्वरूप होते. गीतांच्या कार्यक्रमाचे निवेदन करणाऱ्या अनघा मोडक यांनी म्हटलं की ''शारदेचे वाद्य वीणा' आणि त्या झंकारातून साकारलेला विद्यार्थ्यांचा गौरव, त्यांचा 'विकास' असे सार्थक करणारे हे प्रमुख पाहुणे आहेत. ते खरंच होतं. सार्थक असणाऱ्या या समारंभात अनेक गोष्टी होत्या. त्या सगळ्यांचा उल्लेख सविस्तर करणं केवळ अशक्य. पण तरीही काहींचा उल्लेख अटळच. श्रीम. नलिनी रामराव तळपदे यांनी रचलेली 'विद्यार्थी गौरवगीत' आणि 'अध्यक्षाभिनंदन' ही कवने केवळ अप्रतिम. दरवर्षी होणारी ही शब्दांची कसरत न वाटता आनंददायी गीतरचना वाटणं... सोप्पं नाहीच. पण त्यांची लेखणी ही किमया करते. दरवर्षी त्यांच्याही लेखणीचा झोका असा उंच उंचच जातो. या त्यांच्या गीतांना संगीतसंयोजक आनंद सहस्रबुद्धे आणि मंडळींनी दिलेली स्वररूपे म्हणजे सौंदर्यमहालच. चॅरिटीजची या समारंभाची पुस्तिका शिस्तशीर आणि आल्हाददायक. नेहमीप्रमाणेच सूत्रसंचालन सौ. अनारकली संदीप वेलकर आणि सौ. मेघा जतेन्द्र वाझकर यांनी नेटके केले. बक्षिस वितरणानंतर सादर झालेला संगीत कार्यक्रम म्हणजे आनंदाची लयलूटच. मराठीतील सगळ्या संगीत संयोजकांचा आढावा घेत हा कार्यक्रम सादर झाला. त्यातील सौ. रॉनिका सचिन विजयकरांचा सहभाग विशेषच. सगळे यशस्वी गायक, वाद्यमेळ करणारे वादक - संयोजक निपुण होतेच. पण खास उल्लेखनीय बाबींचाच इथे विचार (शब्दमर्यादा पाळण्यासाठी केवळ!) असल्याने एक उल्लेख अटळ आहे. संगीत कार्यक्रमाची निवेदिका अनघा मोडक. प्रत्येक संगीतकाराची त्यांनी कलापूर्ण, आगळीवेगळी ओळख करून देत सूत्रे हलवली. त्यात माहिती होती, व्यक्तीगौरव होता, संगीताचा इतिहास होता, कालवैशिष्ट्य होते अन् समोरच्या रसिक श्रोत्यांचं भान होते. त्यांचे निवेदन म्हणजे गायकांच्या लयीला दिलेली लयदार, सहज साथ होती. पुन्हा हाती कोणतीही चिठ्ठीचपाटी न घेता. कारण.... कारण या डोळ्यांनी अंध होत्या. पण संगीताचा आंतरिक प्रकाश एवढा की त्यांना कुठेही चाचपडावं लागलं नाही. अगदी सहज, सहजपणे त्यांनी हा कार्यक्रम पुढेपुढे नेला. 'वाटीत श्रीखंड असावं अन् त्यावर केशराची काडी. त्याचा पिवळसर रंग खुलून दिसावा' असं संगीतकाराचं हे वर्णन अनघांनी करावं? हे रंग त्यांनी कसे पाहिले? रसाळ निवेदनात त्यांनी ते अंतर्चक्षूंनी पाहिले! संगीतप्रेमाने, रसिकतेने अनुभवले. म्हणूनच हा संगीत सोहळा यावर्षी खासच झाला. सत्कार सोहळ्यात श्री. नितांत त्रिलोकेकरांनी देणग्यांचे वाचन केले आणि श्री. राजन जयकरांनी आभार मानले.

मला वाटते की या सोहळ्यात चिंब होताना प्रत्येक ज्ञातीयानेच चॅरिटीजचे मनोमन आभार मानले असतील. कारण हा पंचवीसावा लखलख चंदेरी सोहळा होता.

# वंदन तुजला

-सुहासिनी कीर्तिकर

दिनांक पाच डिसेंबरच्या सकाळी सकाळी फोनवरून बातमी आली- 'वंदना नवलकर गेल्या'. त्याआधी पंधरा दिवस त्या व्हेंटिलेटरवर असल्याचे माहीत होते; पण वाटत होतं की, काही 'चमत्कार' घडेल. पण हवेसे वाटणारे चमत्कार घडतातच असं नाही. पण चमत्कार वाटावा असा योगायोग मात्र त्या बेशुद्धीत जाण्याआधी घडला होता. स्वर्गीय प्रमोद नवलकर यांचा स्मृतिदिन म्हणून वंदनाबाईंनी नानानानी शाळेच्या प्राचार्य या नात्याने तेथील विद्यार्थ्यांना पेनाची देणगी त्याच दिवशी दिली अन् त्याच रात्री त्या कोसळल्या. म्हणजे योग पाहा-; बेशुद्धीत जाण्याआधी त्यांनी प्रमोदचं स्मरण केलं, 'नाना-नानी' मधील प्रौढांना भेटून देणगी दिली. जणू त्या भावनिक पातळीवर ऋणमुक्त झाल्या! अशाच आणखी एका योगायोगाचं कवतिक वाटतं. चंद्रकला हाटे यांनी सुरू केलेल्या 'कुटुंबसखी'ला नावारुपाला त्यांनी आणलं. इतकं की त्यांनीच कुटुंबसखी स्थापन केली असं वाटू लागलं. कारण या सखीच्या अनेक ठिकाणी त्यांनी यशस्वी शाखा उघडल्या, खंबीरपणे चालवल्या. त्याबद्दल शासनाकडून त्यांचा सत्कार झाला, माध्यमातून मुलाखती झाल्या. पण मध्यंतरी त्या 'कुटुंबसखी'पासून दूर गेल्या. अलिप्त राहिल्या काही वर्षे. योग असा की, यावर्षी पुन्हा त्या या 'सखी'च्या समाजकार्यात गुंतल्या. जाण्याआधी त्यांच्या आयुष्यातील ही तुटलेली रेषा पुन्हा सांधली गेली. भावनिक ऋणमुक्ती लाभली. आपल्या ज्ञातीच्या महिला समाज आणि सोशल समाजाच्या त्या विश्वस्तपदी होत्या. या दोन्ही संस्थांच्या कुशल आणि शिस्तबद्ध संयोजनात त्यांचा सक्रीय सहभाग असायचा. सोशल समाजातर्फे कनकाईदेवीच्या नवरात्रोत्सवात यावर्षी मंगळागौरीच्या खेळांचे आयोजन संपूर्णतया त्यांचेच होते; इतकेच नव्हे तर; त्या स्वत:ही त्यात उत्साहाने सहभागी होत्या. वयाच्या अवघ्या ऐंशीव्या वर्षी! हाच आणि असाच उत्साह त्या महिला समाजाच्या सहलीमध्येही दाखवीत. म्हणजे जबाबदारी पेलणं, मार्गदर्शन करणं याबरोबरच त्या स्वत:चा सहभाग नोंदवत. तरुणीला लाजवील अशा उत्साहानं. प्रमोद नवलकरांच्या जाण्यामुळं 'प्रभुप्रभात' त्यांनी पोरका होऊ दिला नाही. त्याच्या संपादिका म्हणून त्यांनी जवळजवळ एक तप प्रभात प्रकाशनाची धुरा वाहिली. 'प्रभुप्रभात' वर्धापनदिन नेटाने अन् देखणे साजरे केले. त्यांचं समाजकार्य, त्यांचं संपादन याचबरोबर पाठारे प्रभु संस्कृतीजतनही त्यानी परोपरीने केले. आपल्या सणवारांची माहिती देणे, दिवाळीत रेखले जाणारे 'कणे' (रांगोळ्या) पुढच्या पिढीसाठी लिखित स्वरूपात दस्तावेज म्हणून ठेवणे आदी त्यांनी निष्ठेने केले.

वंदना प्रमोद नवलकर या पूर्वाश्रमीच्या विजया मोतीराम विजयकर. त्यांच्या माहेरच्या बाजूनं माझी ती आत्येबंहीण. म्हणून मी तिला 'विजू' म्हणूनच ओळखते. आमचं दोघींचं माहेरही एकाच गावात- जोगेश्वरीला! म्हणून माझी तिची जवळीक. मी एलफिन्स्टन कॉलेजला शिकवायला असताना त्याच इमारतीत तिचे ऑफिस होते. कँटिनमध्ये आमच्या तासन्तास गप्पा रंगायच्या. तिचे शैशव, तारुण्य यांची मी किंचित् साक्षीदार. ती कॉलेजमध्ये असताना मराठी वाङ्मय मंडळात सक्रीय असायची. तीन अंकी मराठी नाटकातून भूमिका करायची. 'कॉलेजक्वीन' साठीही ती चुरशीत उतरली होती! वक्तृत्वात ती तेव्हा चमकायची. तिच्या पंच्याहत्तरीनिमित्ताने मी 'प्रभुतरुणा'त याबद्दल सगळे लिहिले होतेच. पण आज पुन्हा एकदा सगळे भरभरून वर आले. उंचीने तशी ती बुटकी. जोगेश्वरीच्या आपल्या घरात दाराला ती उंचीसाठी होळखंबे घ्यायची- असंही आठवतेय. पण वंदना प्रमोद नवलकर म्हणून तिनं आपल्या कर्तृत्वाची इतकी उंची गाठली की शरीराची उंची कशाकरिता आठवायची? तिनंही आणि आपणही.

तर अशा कर्तृत्वानं उंचच उंच झालेल्या विजूला- वंदनाला माझे वंदन. तिच्या मागे उरलेल्या आठवणींनाही. तिनं आपल्या केसात माळलेल्या फुलांसारख्या या आठवणी (सुकल्या तरीही) सुंगधीत रहातील.

प्रभुतरूणाची संपादक या नात्यानेही पुन्हा एकदा तिच्या स्मृतींना वंदन.

*

**ललितबंध**

# येनकेन प्रकारेण

-डॉ. सुमन नवलकर

'येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषोभवेत' हा धडा लहानपणी शाळेत प्रत्येकाने वाचलेला असतोच. पूर्वी हेच शिकवलं जायचं की प्रसिद्धीसाठी वाट्टेल ते करू नये. आपल्या पूर्वीच्या पिढीनंही आपल्याला हेच शिकवलं. पिढ्यानपिढ्या चालत आलेली ही शिकवण आपणही आपल्या पुढच्या पिढीला दिली. आपल्या नव्वद टक्के पिढीनं हे आत्मसात केलं नी आपल्या आचरणाचा मार्ग योग्य दिशेला वळवला.

पण काळ झपाट्यानं बदलला हे प्रत्येकाला आता प्रत्येक क्षणी जाणवतंय. ताण, तणाव, अतोनात स्पर्धा हे सर्व प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक नात्यात, प्रत्येक संस्थेत प्रकर्षानं घुसलंय. ह्या समुद्रात प्रत्येकाचा श्वास गुदमरतोय, घुसमटतोय. प्रत्येकजण जगण्यासाठी धडपडतोय. जीवघेणी स्पर्धा, रॅट रेस, अती वेगवान आयुष्य हे शब्द आपण या संदर्भात सर्रास वापरतोय. ताणतणावातून सुटण्याचा प्रयत्न प्रत्येकजण आपापल्या परीनं करीतच असतो. कुणी चांगल्या संगीतात मन रमवतं तर कुणी कुठच्याही छंदात. पूर्वीसुद्धा हेच होतं. ताणतणाव मानवाच्या मनालाच चिकटलेयत. पण छंद, कला ह्या पूर्वी वेगळ्या होत्या. आताही आहेत. पण आता त्यात वेगळ्याच छंदांची भर पडलीय.

सर्वांनाच स्वत:चं मन रिझवावंसं वाटतं नी त्यात काहीही गैर नाही. प्रत्येकाला स्वत:चं स्थान खूप वरचं, आगळं असावं वाटतं नी तसं वाटायलाच हवं. ते मिळवण्याची धडपड पूर्वीपासूनच लोक करतायत. पूर्वीपासूनच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस. नी नंतर लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस यामध्ये स्वत:चं नाव येण्यासाठी लोक जीवाचा आटापिटा करतात. हे पूर्वीपासूनच चालू आहे.

फरक आहे तो पूर्वीच्या मार्गाचा आणि आताच्या मार्गाचा. पूर्वी स्वत:मधल्या कलाकौशल्यांना जास्तीत जास्त सफाईदार, सुबक आकार देऊन या स्पर्धेत लोक उतरत असत. आताही तऱ्हेतऱ्हेचे खेळ, टूर्नामेंटस, स्पर्धा प्राणपणानं जिंकण्याचा अटीतटीचा प्रयत्न केलाच जातो. पण त्यात उत्तेजक द्रव्यांचा वाईट मार्ग, मॅच फिक्सिंगचा अवलंब हे प्रकार प्रकर्षानं दिसतायत. दुसऱ्याला पैसे चारणं, बेईमानीनं काहीही मिळवणं हे तर सर्रास चालूच आहे. त्यासाठी अधिक पैसे मिळवणं व ते मिळवण्यासाठी कोणताही वाईट मार्ग पत्करणं यात त्या लोकांना काहीही वावगं वाटतच नाही.

परंतु अजूनही एक वर्ग असा आहे की, ज्यांना हे जमत तर नाहीच पण रूचत पटतही नाही. सोशल मीडियावरही अनेक चांगले व्हिडिओज व्हायरल होतात. स्वत:चं कौशल्य दाखविण्यासाठी सहज उपलब्ध होणारं हे प्रभावी व उत्तम व्यासपीठ आहे. सर्व जगाशी एकाच वेळी जोडलं जाणं यातूनच सहज साध्य होतं. त्यांना लाख, कोटींच्या संख्येनं लाईक्स मिळतात. त्यांची वाहवा होते. त्यांना मुखप्रसिद्धीही मिळते व हे सगळं चटकन होतं.

कधी एकचाकी सायकलवर कुणी कसरती करतो तर कधी दोन किंवा चार जण एकाच किंवा दोन वेगवेगळ्या सायकलींवर मोठ्या गोलाकारात कसरती करतात, कधी स्कीईंग, स्केटिंग बोर्ड किंवा हुव्हर बोर्डवरच्या कसरती बघायला मिळतात. कधी कुणी एकाच हाताच्या पाचही बोटांमध्ये एलईडी लाईट्सची पेनं फिरवत बोटांची किमया दाखवतात तर कधी दोन हातांची बोटं वेगळंच नृत्य सादर करतात. कधी बर्फावरचा फ्रेंच बॅले बघायला मिळतो. आमच्या पिढीच्या लहानपणी 'हॉलिडे ऑन आईस' नावाचा बर्फावरच्या नृत्याचा अविष्कार घेऊन फ्रेंच नर्तक मुंबईत आले होते. हा शो बघायला प्रचंड गर्दी होई. त्या शोसाठीच्या तिकीटांसाठी लांबच लांब रांगा लागायच्या. त्यावेळी हे सगळं कौशल्य खूप अप्रूप वाटायचं. त्यातही फ्रेंच बॅले बघायला मिळाला होता. स्केट्स लावून पायांच्या बोटावर किंवा प्रसंगी स्केट्सच्या एका टोकावर उभं राहून स्वत:भोवती घेतलेल्या गिरक्या, त्यांचे ते विशिष्ट पोषाख सगळं सगळं आमच्या पिढीच्या मनात तस्संच्या तस्संच आहे. मीडियावर चाकूनं कलिंगडाच्या कापलेल्या अर्ध्या बाजूच्या लाल पृष्ठभागावर तीन गुलाब कोरलेले दाखवले होते. खूपच अप्रतिम अशी ही कलाकारी होती. संपूर्ण लाकडी मोटार जी त्या मोटारीचा मालक प्रत्यक्ष रस्त्यावर नेहमीच्या मोटरीसारखी चालवू शकतो अशी बघायला मिळाली. त्याचे दरवाजे पक्षाच्या पंखांसारखे दिसणारे, वर उघडणारे व खूपच कलाकुसर केलेले होते. एक लाकडी खेकडा तर त्याच्या पायांच्या कडेच्या दंतुर रेषांसकट एकाच लाकडाच्या मोठ्या ओंडक्यातून कापून, कोरून तयार करताना, पाहता आला. एकाच वेळी, खाली झोपलेल्या अवस्थेत, दोन्ही हातांवर तीन व वर उभ्या केलेल्या पायांच्या तळव्यांवर दोन असे मध्यम आकाराचे पाच फूटबॉल लीलया खेळवणारा माणूस पाहिला. तुमच्याकडे कोणतंही कौशल्य असो, या प्रकारे तुम्ही स्वत:चा व्हिडिओ अपलोड करू शकता. असे काही व्हिडीओज पैसेही मिळवून देण्याची शक्यता असते.

परंतु असं कोणतंच कौशल्य नसलेले लोक किंवा अभिनय, नृत्य, लेखन, गायन, वादन, चित्रकला, पेंटिंग्ज, चौसष्ट विद्या व कला यांपैकी कोणत्याच कला किंवा विद्वता, शिक्षण, करिअर यात भरीव कामगिरी करून प्रसिद्धी न मिळविता आलेले लोक सेल्फीकडे जास्त प्रमाणात वळतात. तसंही पूर्वी खूप कुशल फोटोग्राफर वडिलांच्या तळहातावर अकरा महिन्यांचा मुलगा उभा आहे असं फोटोत 'दाखवू' शकत होते. ही सत्तरच्या पूर्वार्धातली गोष्ट आहे. नंतर लग्नामध्ये असे तऱ्हेतऱ्हेचे फोटो उदा. नवऱ्या मुलीच्या हातांच्या ओंजळीत नवऱ्या मुलाचा चेहरा यांसारखे विविध फोटो तयार करू लागले. ही ट्रिक फोटोग्राफी म्हणूनच ओळखली जाई. याचं पुढचं पाऊल मोबाईलवर हवा तेव्हा दुसऱ्याचा फोटो काढणं ठरलं आणि आता सेल्फी. यात वावगं काहीच नाही.

सेल्फी वेगवेगळ्या प्रकारांनी काढण्याची चढाओढ लागते. आपला सेल्फी सगळ्यांपेक्षा जरा 'हटके' असावा या लोकांच्या अपेक्षांतही काही गैर नाही. फक्त ते करण्याचे मार्ग चुकत चाललेयत. सेल्फी अत्यंत दुर्मीळ, दुर्गम ठिकाणी काढलेला असावा हा मोह प्रत्येकाला होतो. पण त्यातले काही दुर्दैवी ठरतात. अपघातांचे बळी ठरतात. मध्यंतरीच्या एका प्रतिनिधीचं म्हणणं मोलाचं होतं. ती मुलगी म्हणाली. ''भयंकर धोका पत्करून काढलेली सेल्फी स्वत: बघायलासुद्धा ती व्यक्ती जीवंत राहात नाही तर मीडियावर पोस्ट करता येणं व त्यातून खूप गर्व व आनंद मिळवणं ही गोष्ट तर लांबच राहिली नं? काय उपयोग अशा सेल्फीचा?'' हे खरंच नाही का?

> **चिंतनिका**
>
> वृद्धाश्रमात एका फलकावर सुंदर वाक्य लिहिले होते-
>
> खाली पडलेल्या सुक्या पानांवरून जरा हळुवारपणे जा...
>
> कारण कडक उन्हात आपण त्यांच्याच सावलीत उभे होतो-
>
> अर्थ कळला तर; काळजी घ्या.

स्मार्टफोनवर साधा, घरात सेल्फी काढून फोनवर असलेल्या विविध ॲप्समधून हवं ते डिझाईन (फुलांचं, वर्तुळ, डिझायनर फ्रेम, दुसरी काही सजावट इ. बरंच काही) फोटोभोवती किंवा पार्श्वभूमीवर दाखवता येतं. तसंच कॉम्प्युटरवर फोटोफॉर्मिंगही होत असतं की! मग दुर्मीळ ठिकाणी सफरीला गेल्यानंतर त्या ठिकाणाचा फोटो व त्या ठिकाणी सुरक्षित जागी उभं राहून काढलेला सेल्फी एकत्र करणं किंवा प्रत्यक्षात घरातच काढलेला सेल्फी व डोंगर माथ्यावर, कड्यावर, धबधब्याच्या मध्ये, रेल्वे ब्रिजच्या बाहेर आलेला गर्डरवर बसलेला असे सेल्फी घरातच तयार करणं अवघड आहे का? थोडीशी कल्पकता, मेंदूला योग्य चालना आणि आधुनिक तंत्रज्ञान अवगत करणारी बुद्धी यांच्या योग्य त्या मिश्रणानं हे सहजसाध्य होऊ शकतं. अशी अनेक मिश्रणं ही होऊ शकतात. पण खूप जणांना ह्या तंत्रज्ञानाचा गंधसुद्धा नसतो. त्यांना नुसताच सेल्फी काढता येत असावा. घरी काढलेला जसाच्या तसा सेल्फीसुद्धा आत्मविश्वासाच्या तेजानं छान झळकू शकतो. तसंच वेडी स्टंटबाजी करताना किंवा धोक्याच्या ठिकाणी उभं राहून सेल्फी काढताना हा विचार प्रथम करावा की हा सेल्फी आपल्याला आपल्या घरच्यांनाही दाखवायचाय, त्यांच्यासाठी, त्यांच्या प्रेमासाठी, आपल्यावर अवलंबून असलेल्यांचाहीसाठी आपण सुखरूप, जीवंत राहणं महत्वाचंच असतं.

परंतु आता कॉम्प्युटरच्या वाढत्या उपयोगामुळं आणि सततच्या मोबाईल किंवा कॉम्प्युटरवरच्या चॅटिंगमुळे मुलं जास्त जास्त एकाकी होत चाललीयत. सोशल मीडियावरच्या जास्तीत जास्त लांबलचक फ्रेंडस् लिस्टचं आकर्षण धोकादायक होऊ लागलंय. तसंच 'पोस्ट केल्यानं' जगभर काही सेकंदातच सेल्फीमुळं मिळणारी

(पान ६ कॉलम ३ वर)

संवाद

# मुंबईमधील बाजारांची स्थापना

-विश्वास अजिंक्य

**भुलेश्वर मार्केट** :- नावाप्रमाणेच हे मार्केट सर्वांना भुलवीत असते. छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनसपासून साधारण २ किलोमीटर अंतरावर हे मार्केट आहे. मुंबादेवी आणि स्वामी नारायण मंदिरापासून जवळ असणाऱ्या या मार्केटच्या पारिसरात अनेक मंदिरे आहेत. हे मार्केट एका जुन्या मार्केटच्या जागीच बांधण्यात आले होते. पण इ.स.१८६८ मध्ये या मार्केटला आग लागली होती. त्यावेळी तेथे १२३ दुकाने होती. त्यानंतर इ.स. १८८८ साली आणखी १०० दुकाने वाढवण्यात आली. दागदागिन्यांसाठी हे मार्केट विशेष प्रसिद्ध होते. याशिवाय या मार्केटमध्ये मोती खडे लेस, कपडे, पूजा साहित्य, देव-देवतांच्या मूर्ती इत्यादी वस्तूंची खरेदी-विक्री होते. पायपुसण्यापासून साबणापर्यंतच्या विविध वस्तू घेण्यासाठी सर्वसामान्य लोकांची तेथे गर्दी होत असते. पांजरपोळ परिसर येथून जवळच आहे. ताजी फळे व भाजीपालादेखील येथे विक्रीसाठी येतो. येथील फुलबाजार तर प्रसिद्धच आहे. भुलेश्वर मार्केट रंगीत काचेच्या बांगड्या, साड्या, मणी, खरे-खोटे दाग-दागिने यासाठी महिला वर्गामध्ये विशेष लोकप्रिय आहे. काळबादेवी, गिरगाव, प्रिंसेस स्ट्रीट आणि मांडवी या परिसरापासून जवळ असणारे हे ठिकाण स्वस्त बाजारासाठी प्रसिद्ध आहे.

**नळ बाजार** :- हे मार्केट इ.स. १८६८ मध्ये जनतेसाठी खुले करण्यात आले व इ.स. १८८७ मध्ये त्याचा विस्तार करण्यात आला. या बाजारात फळे आणि भाजीपाला, तसेच मटण आणि मासळी असे विभाग आहेत.

**चोर बाजार** :- भेंडी बाजारातील मटण स्ट्रीट व आजुबाजूच्या परिसरात दर शुक्रवारी दुपारच्या नमाजनंतर रस्त्यावर, फेरीवाल्यांचा हा बाजार भरतो. या बाजारात जुन्या काळातील वापरलेल्या वस्तू मिळतात. चोर बाजाराला शोर बाजार असेही म्हटले जाते. कारण येथील विक्रेते जोरजोरात आपल्या मालाची प्रसिद्धी करून ग्राहकांना आकर्षित करत असत. मात्र येथे विक्रीसाठी आलेल्या सर्वच वस्तू चोरीच्या नसतात. चोर बाजारातील (मटण स्ट्रीटवरील) दुकाने शुक्रवारी बंद असतात. चोर बाजारातील दुकानात व दर शुक्रवारी रस्त्यावर भरणाऱ्या बाजारात विविध प्रकारचे दिवे, हंड्या, झुंबरे, घड्याळे, तांब्या पितळेच्या कलाकुसर केलेल्या वस्तू, तबके, रेडिओ, ग्रामोफोन, ग्रामोफोनच्या जुन्या रेकॉर्डस्, अशा वस्तू मोठ्या प्रमाणावर मिळतात.

**झवेरी बाजार** :- इ.स. १८६४च्या दरम्यान, भारतात दागिन्यांच्या क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या त्रिभुवनदास भीमजी झवेरी यांनी झवेरी बाजार सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हे मार्केट विविध प्रकारच्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध आहे. दागिने घडविणाऱ्यांचा मोठा उद्योगही येथे चालतो. भुलेश्वर व क्रॉफर्ड मार्केट जवळील छोट्या छोट्या गल्ल्यांमध्ये दागिन्यांची अनेक दुकाने वसलेली आहेत. शुद्ध सोने व सोन्याचे दागिने, चांदीची नाणी, विटा व बिस्कीटे, तसेच हिरे व इतर रत्नांच्या खरेदीसाठी मुंबईतील लोकांची येथे गर्दी होते.

**दादरची मार्केटस्** :- दादर पश्चिमच्या रेल्वे स्टेशनजवळच असणाऱ्या विविध मार्केटस्मुळे हजारो लोकांची सोय झाली. दादर आणि आजुबाजूच्या परिसरातील अनेक लोक या मार्केटस्मधून भाजीपाला, फळे, फुले, किराणा माल खरेदी करत असतात. घाऊक आणि किरकोळ असे दोन्ही व्यवसाय येथे चालतात. पहाटेपासून वेगवेगळ्या भागातून फळे, फुले, भाजीपाल्याने भरलेले ट्रक येथे येत असतात. माल उतरविणे, त्यांची वर्गवारी करणे, घाऊक विक्रेत्यांना तो उपलब्ध करून देणे; अशा प्रकारचे काम येथे चालते. रेल्वे स्टेशनपासून अत्यंत जवळ असल्यामुळे बरेचसे विक्रेते येथून माल विकत घेऊन रेल्वे मार्गाने आपआपल्या इच्छित स्थळी पोहोचतात. तेथून तो माल स्थानिक बाजारांमध्ये विकला जातो. पहाटे किरकोळ ग्राहकांपेक्षा घाऊक माल खरेदी करणाऱ्यांची गर्दी जास्त असते.

१९व्या शतकामध्ये मुंबईमध्ये जवळपास ३० सुनियोजित व सुनियंत्रित मार्केटस् होती. त्यापैकी १८ खाजगी; तर १२ महानगरपालिकेची होती. फोर्ट परिसरामध्ये इ.स. १८६७ मध्ये मिंट रोड येथे मार्केट बांधण्यात आले. खाजगी मार्केटस् अनेक होती ; पण त्यापैकी केवळ १८ मार्केटस् सुनियंत्रित होती.

(क्रमशः)

*

## आणि टेलिफोन शांत झाला

-अचला सुभाष देसाई

४ नोव्हेंबर या दिवशी ती बातमी माझ्या फोनवरून मनावर आदळली. मी सुन्न झाले. माझी नणंद सौ. आज्ञा अच्युत लोके (पूर्वाश्रमीच्या मंदा अजिंक्य) तडकाफडकी गेल्या. एक तासआधी त्या माझ्याशी बोलल्या होत्या. रोज सकाळी दहा वाजता न चुकता त्यांचा फोन यायचा. त्यांच्याकडे बोलण्यासारखं भरपूर असे. माझी केवळ नणंदच नव्हे तर; त्या माझी मैत्रीणच होत्या. आम्ही अनेक ठिकाणी फिरायला, स्थळांना भेटी द्यायला जायचो. त्यात सगळी आखणी, पुढाकार त्यांचाच. मंदाताई गणेशभक्त. स्वामी उपासक. त्याच भक्तीभावनेने त्यांनी सासरमाहेरचा गोतावळा आपलासा केला होता. त्यांना खाऊपिऊ घालण्यात त्यांना खूप समाधान मिळायचे. फिरण्याचा, खाण्याचा, माणसं जोडण्याचा त्यांचा छंद.

आता रोज सकाळी दहा वाजता त्यांचा फोन नाही येणार. त्यांचा चिरपरिचित आवाज नाही ऐकू येणार; पण त्यांची आठवण मात्र सततच येत रहाणार.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजतर्फे वार्षिक आनंद मेळावा रविवार, दि. ६ जानेवारी २०१९ रोजी पाठारे प्रभु सांस्कृतिक हॉल, खार येथे सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत घेण्यात येईल. मेळाव्याचे उद्‌घाटन अभिनेत्री आशालता वाबगावकर यांच्या हस्ते होईल. अधिक माहितीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व चिटणीसांकडे संपर्क साधावा. ३० डिसेंबरपर्यंत स्टॉल भाडे रु. १०००/- भरावे. एक्स्ट्रा टेबल व इलेक्ट्रिक पॉईंटचे भाडे वेगळे पडेल. अध्यक्ष. सौ. नीता सेजित (९८२०१६६२८), उपाध्यक्ष - सौ. साया नवलकर (९८२१३००३९९), चिटणीस - सौ. पल्लवी कोठारे (९८६७६६४७८९), सं चिटणीस - सौ. नूतन कीर्तिकर (९६१९६८१३१), सं. चिटणीस - सौ. रश्मा विजयकर (९८२०९८१८८२)

पाठारे प्रभु महिला समाजाचा वार्षिक बक्षिस समारंभ रविवार, दि. १७ फेब्रुवारी २०१९ रोजी खार येथील पाठारे प्रभु सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात साजरा करण्यात येईल. ज्या विद्यार्थीनींनी आपले गुणपत्रक, उत्तीर्णतेचा दाखला यांची झेरॉक्स प्रत समाजाकडे पाठविली नसेल तर ती त्यांनी ६ जानेवारी २०१९ पर्यंत महिला समाजाच्या चिटणीस सौ. पल्लवी कोठारे (९८६७६६४७८९), सौ. नूतन कीर्तिकर (९६१९६८१३१) सौ. रश्मा विजयकर (९८२०९८१८८२) यांच्याकडे कृपया २५ जानेवारी २०१९ पर्यंत पाठवावी. महिला समाजाच्या सभासद भगिनी व बक्षिसप्राप्त विद्यार्थीनींनी दुपारी ४ वाजेपर्यंत उपस्थित रहावे.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाचा दिवाळी महोत्सव १८ नोव्हेंबर २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजता खार येथील पाठारे प्रभु को.ऑप. हौ. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात सॉलिसिटर राजन मोतीराम जयकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. स. सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी सर्वांचे स्वागत करून सूत्रसंचालन केले. सोशल समाजाच्या अध्यक्षा श्रीम. स्वाती राणे यांनी आपल्या प्रास्ताविकात दीपावलीचे महत्त्व सांगून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून त्यांना समाजातर्फे भेटवस्तू, मिठाई व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. श्रीमती स्वाती राणे परिचय करून देताना म्हणाल्या, ''सॉलिसिटर राजन जयकर हे एक अजब रसायन आहे. न्यायालयाशी संबंध असूनही ते साहित्यिक आहेत, संस्कृती जतन करणारे संग्राहक आहेत, धार्मिक आहेत. तसेच सामाजिक कार्यकर्तेही आहेत. सौ. राजन जयकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पाठारे प्रभु सोशल समाजाच्या पूर्वीच्या आठवणी जागवल्या. त्यावेळी ते समाजाच्या निरनिराळ्या स्पर्धांत, पुस्तक परिचय करून देणे अशा कार्यक्रमात भाग घेत असत. त्यामुळे त्यांच्या आमच्या यशाची जडणघडण काहीशा प्रमाणात समाजात झाली.''

नंतर समाजाच्या कार्यकारी समितीचे सभासद श्री. अभिजित विजयकर यांनी देणग्या वाचून दाखविल्या. सोशल समाजाचे उपाध्यक्ष श्री. तुषार जयकर यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी डीवाईन एन्टरटेनमेंट प्रस्तुत मराठी आणि हिंदी गीते, नृत्य आणि नकला सादर केल्या गेल्या. कार्यक्रमाची सांगता समाजातर्फे सर्वांना कॉफी देऊन करण्यात आली.

पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे दरवर्षी ज्ञातीतील एस.एस.सी. (१० वी) व तत्सम तसेच पुढील उच्च स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण होण्प्रया विद्यार्थी व विद्यार्थीनींना शनिवार दि. ६ एप्रिल २०१९ रोजी गुढीपाडव्याला समाजाच्या वर्धापनदिनी शैक्षणिक पुरस्कार प्रदान केले जातील. तरी सर्वांनी आपले गुणपत्रक, उत्तीर्णतेचा दाखला झेरॉक्स प्रत सोशल समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर (मो. नं. ९८६७९५८५३५) व सौ. नीता सेजित (मो. नं. ९८२०१६६२८) यांच्याकडे ३१ जानेवारी २०१८ पर्यंत पाठवावीत.

*

# परभी भाषा आणि त्याचे पर्यायी शब्द

**-प्रणिता प्रभाकर**

**१) स्वयंपाकघरातील वस्तू**

चुलीपस - स्वयंपाकघर
कासला - कप
गावी - पकड /सांडशी
रकाबी - झाकणी
कालथा - उलथणी
पळी - डाव
मोरळी - विळी
ताजले - कढई
टोप - भांडे /पातेले
लंगडी - कानाचे चपटे भांडे
तसला - चपटे भांडे
भगुणं - टोप
विरॉळी - भोकाची टोपली
कावला - तेलाची तवी
बकम - काचेचा उभा डबा
साठ - पाण्याचे छोटे पिंप
(लाडूबाप्पाचा डबा - मोदकपात्र)
भाटी - 'अव्हन'/भट्टी कोळशाची

**२) खाण्याचे पदार्थ**

बाजार - मासे
सरंगा - पापलेट
काउलटी - छोटे पापलेट
गोळीचं - घोळ मासा
चिंबोरी - खेकडा
कुडकी - माश्याची तुकडी
कापटी - फोड
कवट - अंडे
पोळा - आम्लेट
गोड रवा - शिरा
शिंगडी - करंजी
चाकी - गोळी / टॉफी
केशरी भात - साखर भात
सोय - खवलेला नारळ
कराटी - करवंटी
डांगर - भोपळा
बोन्ड - मक्याचे कणीस
बटाट - बटाटा
बटाटी - बटाटे
शिराळी - दोडकी
सुकडी - दिवाळी फराळ
फोडणीचे वरण - आमटी /डाळ
मिरी - लाल तिखट
पातवड - अळूवडी
चकला - चकली
निवशी - शाकाहारी
सिवशी - मांसाहारी
बटाटवडा (बटरोळी) - बटाटा वडा
भुजणे, खडखडले, आटले, गोडे आटले, गोडी बटाटी, गुरवळी, केरवळी, पुर्णी, अननसाचे सांभारे/सांबारे
(निरामिष - निवशी आणि सामिष - सिवशी अशी व्युत्पत्ती आहे -संपादक)

**३) वैयक्तिक वस्तू / शब्द**

सोकाजी - पाठारे प्रभू व्यक्ती
कंचोळे - गंध उगाळून ठेवण्याचे पात्र
बणवय - मेहुणा (बहिणीचा नवरा)
मावसा - भाऊजी (मावशीचा नवरा)
आतस - आत्या
आतोबा - आत्याचा नवरा
धुडी - पुतणी
फणी - कंगवा
शेंडा - आंबाडा
साबू - साबण
बालदी - बादली
तुमान - चड्डी
गंजीफ्रॉक - गंजी/ बनियान
कमीज - शर्ट
वासकूट - Waistcoat
पातळ - साडी
लुगडे - ९वार साडी
डगला - लांब कोट
सोवळे - पितांबर
इस्कीचे कपडे - रंगीत कपडे (फॅन्सी ड्रेस )
पाळणीत- मामाकडली वधूला लग्नात नेसवायची साडी
टुवाल - टॉवेल
पासोडा - पलंगपोस सफेद
गिलिप - उशीचा आभ्रा
हातरी -चटई
बुरणूस - रजई
सुपेती - गादी
फेरसुत - मळसूत्र
गरसोळी - गळसरी /मंगळसूत्र
वाळी - नथ
चूक -चमकी
खेळणे - बाजूबंद
आचवणे - चूळ भरणे
आवतण - आमंत्रण
चिंकोडा/चिमकोडा काढणे - चिमटा काढणे
(गुंडी - बटन, माथं उकलणे - केस विंचरणे, खेळणे - बाजूबंद, मघारी - मागे, सोकरा,सोकरी-मुलगा,मुलगी -संपादक)

**४) सर्व सामान्य वस्तू**

दादर - जिना
सदर - दिवाणखाना
पडवी - पोटमाळा
बारी - खिडकी
बारी - फडताळ
देसक/कबाट - कपाट
चावी - किल्ली
टाळे/टाळं - कुलूप
गजवा - खिसा /पाकीट
चांदला - आहेर
चांदला - हळदीकुंकूला वापरायची चकचकीत टिकली
चांदवा - पूर्वी चौकोनी कापडावर नभांगण काढून ते छताला लावून त्या खाली वधू वर उभे राहत व लग्न लावत. म्हणजेच सूर्य चंद्र तारकांच्या साक्षीने लग्न लावत
भातकं - लग्नात मुलीला आईने दिलेली तांब्याची भातुकली
चिठ्ठी - आमंत्रण पत्रिका
पंचपाळे - हळद कुंकवाची कोयरी
तरमण - ताम्हण
कणा - रांगोळी
माकोडा - डोंगळा
झीरूळ - झुरळ
केमस - कीटक
सुतेरी - जळमट
सबुरी - थांबणे
बुराक - भोक
इतवार - रविवार
गयलट - वेडा
अवस/आमोश्या- अमावस्या
इतवार - रविवार

वि. सू : श्री संदीप दहिसरकर 'परभी भाषा' या विषयावर अभ्यास करीत असताना, जुलै ऑगस्ट महिन्यात त्यांनी आपल्या ज्ञाती बांधवांकडून परभी शब्दांची मदत मागितली होती व ती आपण सर्व बंधूभगिनींनी उत्साहाने प्रतिसाद देऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. अर्थातच आपल्या फूडीज ग्रुपवर. त्या सर्व शब्दांचे संकलन करून मी आपल्या पुढे मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. धन्यवाद .

*

**बालविभाग**

# Things

**-Armaan . A . Kothare**
www.armaankothare.blogspot.com

These days parents have this phobia about letting their children handle any responsibility, for example, take my friend, Ned. His parents don't even let him keep a pen of his own, and I'm pissed off because he takes **my** pens to write!!! He tells me everyday, "I wish I had something to take care of..." and "Oh Jeff, could you lend me your **things** for safekeeping?". And the type of smart guy I am, I already have a responsibility: Keep my things away from Ned. Okay, maybe Ned isn't even capable of it, but how can we be sure without even trying? And even if he isn't capable enough, why do I have to suffer? So, when he came to my house for another shot at convincing me to allow him to keep my things for the day, I told him to ask his parents to give him one chance of proving himself.

And guess what, they did.

After an hour or so, an 'earnest' Ned showed up at my door, house keys sticking out of his mouth.

I had to tell him how stupid and daft that was, but he was stubborn. So, we came down to an agreement of him keeping the keys in his pocket (as if that was not what a normal person would do).

But, you *too* know that (for Ned) this was too good to be true. There is always (not really) the calm before the storm. And right I was.

But, in this case, things weren't actually like a *storm. All* that happened was that when we were at a pizzeria, giving an order of a type of pizza that would make Ned need bigger clothes, he realised that his pocket was empty. He started jumping and running around like an untamable animal. Man, he really knew how to draw attention. He only calmed down when I promised to help him.

And thats when it hit me. Ned's parents could not trust him with a pen. They couldn't even trust him with a good pair of jeans!!! And there was a big enough hole in his trousers for my proof.

We traced back our steps from my house to the pizzeria. This was the first time Ned had ever been looking for something, as he never had anything before!!! As we treaded towards my house, we found the keys, lying with utmost respect in the middle of the sidewalk.

I thought my job was done. Ned must've returned home with the keys. At least his parents didn't know that I was the one who helped him (#wink). I decided to award myself with a cup of tea.

Just as I was about to do so, the doorbell rang. I walked towards the door, grumpily. And, it was Ned.

"Thanks Jeff! Now my parents totally trust me (with a pen)!", he exclaimed.

"Cool dude. Why did you come here then?", I replied, stressing on the 'you' part.

"Oh, um, I want you to have this.", he said, pulling out his house keys.

"But why would I need (or take) that?", I asked, totally puzzled.

"You will, for safekeeping of course."

"Dude, your parents trust you now! You could do that too."

"But, you at least have a good pair of jeans."

I tried not to laugh, and thought to myself,

'Oh, just how the tables have turned'!!!

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

०५-१२-१८ सौ. अमृता आणि श्री. अमित प्रद्युम्न कोठारे, पुत्र, गिरगाव

### नारळसाखर दिला

२५-११-१८ श्री. प्रणव संदीप वेलकर कु. कौशिकी बिस्वभरन् चक्रबर्ती (आं. ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

६-१२-१८ श्री. अमित मंदार माधव नायक, कु. रेनाते हुबेर (आं. ज्ञा.)

### विवाह सुवर्णमहोत्सव

०१-१२-१८ सौ. मनिषा (पूर्वाश्रमीच्या कु. ज्योत्स्ना मुकुंदराव रणजीत) आणि श्री. शरद मुकुंदराव कोठारे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १८-११-१८ | श्रीम. डॉ. सुधा प्रमोद त्रिलोकेकर, | | खार |
| ०५-१२-१८ | श्रीम. वंदना प्रमोद नवलकर | वय ८०, | गिरगाव |

## प्रभुतरुणास देणगी

* श्री. सुनील कोठारे यांजकडून रु. ५०००/- (कन्या डॉ. स्नेहा कोठारे हिचे २ पेपर इंटरनॅशनल जर्नलमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रीत्यर्थ)
* सौ. उल्का सुरेश विजयकरकडून रु. ३०००/- दिवाळी भाऊबीज.
* श्री. मुकुंद गोरक्षकर यांजकडून रु. २०००/-
* कस्तुर रवींद्र तळपदे कडून रु. १००१/-
* सौ. जना रवीन्द्र नवलकर आणि परिवाराकडून भाऊबीज रु. ५०१/-
* सौ. मनिषा आणि श्री. शरद मुकुंदराव कोठारे यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवाप्रीत्यर्थ रु. ५०१/-
* श्री. प्रकाश जयकर यांजकडून रु. ५००/-
* सौ. वृषाली संदीप कोठारे यांजकडून रु. ३५०/-

सर्वांचे मन:पूर्वक आभार.

## अभिनंदन

* श्रीम. तारिणी सुबोध आणि श्री. सुबोध नारायण कोठारे यांच्या डॉ. रुपाली या कन्येची कन्या कु. प्रिया राहुल मोरे हिने प्रशंसनीय यश प्राप्त केले. 'मला सगळ्यात जास्त स्फूर्ति देणारी गोष्ट' या विषयावर जागतिक स्तरावर 'गुगल'ची स्पर्धा होती. या स्पर्धेत भारतातून ७५००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. संकल्पना, लिखाण आणि, चित्रण या स्तरांवर परीक्षण होऊन जागतिक स्तरावर पंचवीस विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड झाली. नंतर त्यातून पाच अंतिम पातळीवर निवडले गेले. कु. प्रियाने या पाचात आपले स्थान निश्चित केले. तिच्या यशाची बातमी म.टा., लोकसत्ता आदी वृत्तपत्रात पहिल्या पानावर ती आणि तिच्या सादर झालेल्या चित्रासह झळकली. अभिनंदन.

* डॉ. सुमन नवलकर यांच्या 'चिंध्यांची बाहुली' ला नागपूरचा 'पद्मगंधा' पुरस्कार लाभला. या पुस्तकाला लाभलेला हा लागोपाठ तिसरा पुरस्कार. अभिनंदन. त्यांचे आठ दिवाळी अंकात लेखन प्रसिद्ध झालेय. (गेल्या अंकात चुकून आठ न येता पाच आले होते.)

* अंधेरी (पूर्व ) येथील 'मेघदूत' ही स्टेट बँक कर्मचाऱ्यांची हाऊसिंग सोसायटी. २०-१०-१८ रोजी या सोसायटीचा सुवर्ण महोत्सव साजरा करताना श्री. अरविंद धराधर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. गेल्या पन्नास वर्षांतील घटनांची विविध छायाचित्रे यावेळी प्रदर्शित झाली.

⁕

## चुकीची दुरुस्ती

गेल्या अंकात पा. प्र. चॅरिटीजच्या दिवाळी संमेलनाचा अहवाल सादर करताना एक अक्षम्य चूक झाली. श्री. अजित विजयकर यांच्या नावाऐवजी श्री. अजित तळपदे यांचे नाव मुद्रित झाले. क्षमस्व.

⁕

(पान ३ कॉलम ४ वरून)

लोकप्रियता पौगंडावस्थेच्या उंबरठ्यावरच प्रसिद्धी मिळवून देते म्हटल्यावर जगाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू होण्याचा हव्यास न वाढला तरच नवल. ह्या हव्यासाला आता वयाची मर्यादाही राहिलेली नाही. परंतु अशी सवंग (क्षणभंगुर) लोकप्रियता मिळवण्यापेक्षा काहीतरी भरीव चांगले प्रयत्न करावे व चांगलं 'नाव' कमवावं हे त्यांना पटतच नाही. कारण ह्या गोष्टी साध्य होण्यासाठी कधी कधी बराच काळ लागतो. तशातच एस एम एसची पर्यायानं शॉर्टकट्सची सवय नव्हे चटकच लागलीय.

आयुष्याचा प्रत्येक खाजगी क्षण कुणालातरी सांगावासा वाटणं तोही काही सेकंदांमध्ये जास्त आवडायला लागलंय. त्यातही शब्दांऐवजी त्याचेही शॉर्टकट्स आणि स्माईलीज, स्मोजीज यांचाच जास्तीत जास्त उपयोग होऊ लागलाय. त्यातूनच हे स्वत:बद्दलचं वेडं आकर्षण जबरदस्त मूळ धरू लागलंय. घरातल्या जीवंत लोकांशी प्रत्यक्ष संवाद तुटायला आलाय. नार्सिसस राजाची गोष्ट प्रकर्षानं आठवतेय - स्वत:वरच प्रेम करणारा हा राजा मृत्यूनंतर फुलाच्या रुपात तळ्याच्या काठीच राहतो व तळ्यात सतत आपलंच प्रतिबिंब न्याहाळत राहतो.

नी त्याचाच अतिरेक सेल्फीत रुपांतरीत झालाय. पण सेल्फी हा आपल्या व्यक्तिमत्वाचा आरसा आहे हे लक्षात घेऊन आपल्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाचं तेज शोधावं, हुषारीच्या बारीक रेषा दिसतायत कां ते न्याहाळून बघावं आणि नसेल तर हे चांगले गुण निर्माण होण्यासाठी, जोपासण्यासाठी व वाढवण्यासाठी काय करावं ह्याचा शोध घेऊन तसे प्रामाणिक प्रयत्न करावेत. पण तसं न होता फक्त बाह्य रुपाची भलावण, चेहऱ्याची रंगरंगोटी किंवा मेकओवर एवढाच मर्यादित बदल केला जातो. तसंच, एकानं केलं म्हणून दुसऱ्यानं केलं अशीच वृत्ती दिसून येतेय. हे टाळलं तर ह्या नवीन तंत्रज्ञानाचा खूप मोठा उपयोग होईल. नाहीतर आंधळ्या अनुकरणाने, एका सिनेमात नायिका नायकाच्या गळ्यात लाडानं मंगळसूत्र बांधते म्हणून प्रत्यक्षात साठ तरुणींनी त्याला मंगळसूत्राची भेट पाठवण्यासारख्या हास्यास्पद घटना त्याही मोठ्या प्रमाणावर घडतच राहतील. कुठच्याही हीरोच्या गळ्यात प्रत्यक्ष मंगळसूत्र बांधणं व त्याचा सेल्फी काढणं तसंच एखाद्या सेलिब्रिटीला भर गर्दीत किंवा स्टेजवर जाऊन मिठी मारणं आणि सेल्फी काढणं वगैरे गैर प्रकारही होतच रहातील. म्हणूनच सेल्फी काढा. तोसुद्धा घरच्या घरी 'हटके' होईल हे बघा आणि कल्पकतेनं तुम्ही प्रसिद्ध व्हाल असं काहीतरी करा-

माझी खात्री आहे की मानवी मेंदूला योग्य दिशेनं वळवल्यास खरी सुप्रसिद्धी तुम्ही मिळवूच शकाल.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67